| | फौ.कि.अर्ज ७६/२०२१ निशाणी १८ खालील आदेश |
|---|---|
| | CNR MHRT080002312021 |

०१. अर्जदाराने सदरचा अर्ज अंतरीम पोटगी मिळण्याकरता दाखल केलेला आहे. अर्जदाराचे म्हणणे थोडकयात असे की, अर्जदार व सामनेवाला हे पती पत्नी असून त्यांचा विवाह दि. १६/०५/२००६ रोजी मौजे बोंडये, ता. संगमेश्वर येथे हिंदू धर्माप्रमाणे झाला. लग्नामध्ये अर्जदार क्र. १ च्या आईने तिला घातलेले सोन्याचे मंगळसूत्र व नथ सामनेवालाने लग्नानंतर विकून टाकली आहे. तसेच सामनेवालाने स्वतः घातलेले दागिने देखील विकलेले आहेत. लग्नानंतर केवळ आठच दिवस अर्जदार व सामनेवाला बोंडये येथे राहिले. त्यानंतर सामनेवालाचे आई – वडिल, बहिण हे अर्जदारासोबत कुर्ला, मुंबई येथे एकत्र राहत.

०२. सामनेवालाला दारुचे व्यसन असून तो रात्री उशीरा येत असल्याने अर्जदाराने त्याला कारण विचारले असता सामनेवाला तिला वारंवार अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन मी जुगार खेळत होतो असे उत्तर देत असे. सामनेवालाच्या या कृत्याला त्याच्या आई– वडिलांचा विरोध नाही. अर्जदार क्र. २ व ३ ही त्यांची अपत्ये आहेत. मात्र, त्यानंतर देखील सामनेवालाच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. सामनेवालाने अर्जदार क्र. १ ते ३ यांची कधीही काळजी घेतली नाही. अर्जदार क्र. १ धुणी भांडी करुन घरखर्च भागवत असत. सामनेवालाची आई आणि बहीण यांनीदेखील त्याला अर्जदाराविरुध्द भडकवलेले आहे. सामनेवालाने अर्जदार क्र. १ ला वारंवार विविध पध्दतीने जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत. सामनेवालाच्या याकृत्यामुळे अर्जदार क्र. १ अनेकदा बेशुध्द पडत असत. एप्रिल २०१७ मध्ये सामनेवाला याने अर्जदार क्र. १ ते ३ यांना दारुच्या नशेत मारहाण करत घराबाहेर काढले. तद्नंतर अर्जदार तिच्या

माहेरीच राहत आहे. आजतागायत सामनेवालाने कधीही अर्जदाराला बोलण्याचा प्रयत्न केला नाही. तिला माघारी बोलाविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. वयोमानानुसार अर्जदार क्र. १ शारिरिकदृष्टया कमकुवत झालेली आहे. सामनेवाला कमावता असून देखील त्याने अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी इच्छापूर्वक झीडकारलेली आहे.

०३. सामनेवाला रिक्षाचालक असून त्याचे वडील आणि बहीण दोघेही कमावते आहेत. सबब, ते त्याच्यावर अवलंबून नाहीत. सामनेवाला दरमहा रक्कम रुपये २०,०००/– कमावतो. सबब, त्याच्यावर इतर कोणतीही जबाबदारी व कर्ज नसल्याने, त्याला मूळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत अंतरिम पोटगी अर्जदार क्र. १ ते ३ यांना देण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

०४. सदर अर्जावर सामनेवालाचे म्हणणे मागवण्यात आले. मात्र सामनेवालाने कोणतेही म्हणणे दाखल न केल्याने अर्ज विना म्हणणे चालविणेत आला. सामनेवालातर्फे विधीज्ञ श्री. पी.पी.मांगले यांनी नि. २२ –१ येथील नोटीसीअन्वये सामनेवालाचे वकीलपत्र रद्द केले आहे. सबब, त्यांनी कोणताही युक्तीवाद केला नाही. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्रीमती पी.सी.चव्हाण यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

०५. अर्जदाराने नि.१२ येथे कर्ज व मालमत्ता संबंधी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अर्जदार सातवी पास असून दरमहा तिला रक्कम रुपये १९,०००/– चा खर्च येतो. तीचा मुलगा १७ वर्षे व मुलगी १५ वर्षाची असून त्यांच्यावर दरमहा रु.६०००/– इतका खर्च येतो. सामनेवाला १० वी पास असून त्याच्याकडे रिक्षा आहे. ज्यामधून तो दरमहा रु.२०,०००/– चे उत्पन्न घेतो.

०६. वरील चर्चेवरुन प्रथम दर्शनी हे निष्पन्न होते की, आज रोजी अर्जदार क्र. १ ते ३ व सामनेवाला एकत्र राहत नाहीत. अभिलेख पाहता अर्जदार क्र. १ हिच्याकडेच

मुलांचा ताबा असल्याने तिला मुलांच्या उदरनिर्वाहासाठी खर्च येणे स्वाभाविक आहे. मात्र, सामनेवालाच्या दरमहा उत्पन्नाबाबत कोणताही लेखी पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नाही. मात्र, सामनेवालावर इतर कोणाचेही अवलंबून नसणे, त्याच्या उत्पन्न कमावण्याच्या शारीरिक असमर्थतेबाबत काहीही विधान न येणे, त्यांची निरोगी व सदृढ शरीरयष्टी या सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार केला असता या निष्कर्षापर्यत सहज पोहचता येते की, सा.वाला यांची अर्जदाराला उदरनिर्वाह रक्कम पोहचवता येणे बाबत ऐपत आहे.

०७. फौ.प्र.सं.कलम १२५ याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या कलमांअन्वये पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही इसमाने स्वतःहाचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या पत्नीचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा नकार केला तर अशी उपेशा किंवा नकार शाबीत झाल्याबाबत न्यायालय अशा इसमाने आपल्या पत्नीच्या अथवा इतर नमुद व्यक्तींना निर्वाह करीता मासिक भत्ता द्यावा असे निर्देशित करु शकते. या कलमाच्या स्पष्टीकरणाच्या संज्ञेमध्ये असे लिहीले आहे की, पत्नी या संज्ञेत जीला पतीने घटस्फोट दिला असून किंवा जीने त्याच्यापासून घटस्फोट घेतलेला असून पुनर्रविवाह केलेला नाही अशी स्त्री समावेश होते. सदर कलमामध्ये मासिक भत्ता मिळवण्यास पात्र होण्यासाठी अर्जदाराला ती सा.वालाची पत्नी आहे ही बाब सिध्द करावी लागते. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सा.वाला यांना त्यांच्यातील नातेसंबंध मान्य आहेत. प्रथमदर्शनी या अर्जामध्ये असे निदर्शनास येते की, अर्जदाराचे वय वर्षे ४० आहे. तिला कोणताही शारिरिक व्याधी नाही. तिच्यावर केवळ मुलांच्या संगोपनाची, शिक्षणाची जबाबदारी आहे. इथे नमुद करणे गरजेचे आहे की, अजुनपर्यंत दोनही बाजूचा पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे पुरावा समोर येण्याआधीच कुठल्याच निष्कर्षापर्यंत पोहचणे न्यायोचीत होत नाही. प्रथमदर्शनी अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार व सा.वाला

यांच्यातील विवाह अद्याप टिकुन आहे. सामनेवालाने त्याचे म्हणणे दाखल करत अर्जदाराची कथने नाकारलेली नाहीत. सबब सा.वाला यांनी त्यांची ऐपत असताना अर्जदार यांचा निर्वाह करण्यात इच्छापुर्वक नकार दिलेला आहे असे म्हणता येईल.

०८. अर्जदार व सा.वाला सध्या दोघेही वेगवेगळ्या ठिकाणी राहतात. अशा परीस्थीतीत सा.वालाने तीच्या निर्वाहाकरीता कोणती उपाययोजना केली याबाबत कोणताही लेखी पुरावा दाखल केला नाही. सबब अंतरीम अर्ज विचारात घेता प्रथमदर्शनी अर्जदार व तिच्यावर अवलंबित असलेल्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी पाहता अर्जदाराच्या मागणीप्रमाणे उदरनिर्वाहाची रक्कम सध्याची महागाई व शैक्षणिक खर्च विचारात घेता दरमहा मागणी केल्याप्रमाणे रक्कम रु. प्रत्येकी ३०००/– इतकी अंतरीम पोटगी मंजूर करणेत येते आहे. अर्जदाराला अंतरीम पोटगी ही या अंतरिम अर्जाची तारीख दिनांक ०८/०८/२०२४ पासून मंजूर करणेत येत आहे. त्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करणेत येतो.

०२. सामनेवाला यांनी अर्जदार क्र. ०१ ते ०३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ३०००/– इतकी रक्कम या अंतरिम अर्जाची तारीख दिनांक ०८/०८/२०२४ पासून अंतरीम पोटगी म्हणून द्यावी.

०३. सदर आदेशाची प्रत पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.01.15 18:04:19 +0530

**स्थळ – देवरुख** **(श्रुती ह. पाटील)**

**दिनांक– १५.०१.२०२५** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवरुख.**

| -:CERTIFICATE:- | | |
|---|---|---|
| Order below Exh. 18 in Cri.MA No. 76/2021 | | |
| I affirm that the contents of this Pdf file are same words as per original file. | | |
| Name of Stenographer | :- | Sou. Tikekar (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Jt. Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 15/01/2024 |
| order signed by PO. on | :- | 15/01/2024 |
| order uploaded on | :- | 15/01/2024 |